## हुरडा पार्टी

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



## सेवेकरी भरती

१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १८२ वा | शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR





# निवडणूक आयुक्तांची नियुक्ती सरकारच करणार असेल तर देशातील लोकशाही धोक्यात !



## सर्वोच्च न्यायालयात प्रशांत भूषण यांचा जोरदार युक्तिवाद

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळण्याच्या निर्णयावर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात तीव्र आक्षेप घेण्यात आला. जर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा निर्णय पूर्णपणे सरकारच घेणार असेल तर देशातील लोकशाहीला धोका आहे. निवड प्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळणे लोकशाहीची थट्टा आहे, असा जोरदार युक्तिवाद ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयात केला.

मोदी सरकारने डिसेंबर 2023 मध्ये देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंबंधी नवीन कायदा केला. निवडणूक आयुक्तांची नेमणूक करणाऱ्या समितीमधून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले व त्याजागी पंतप्रधानांनी नाव सुचवलेल्या पेंद्रीय मंत्र्याला स्थान देण्यात आले. नवीन कायद्यातील या बदलाला 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स' स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. ती याचिका प्रलंबित असतानाच निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून बढती देण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी मंगळवारी संस्थेची याचिका न्यायमूर्ती सूर्या कांत यांच्या खंडपीठाच्या निदर्शनास आणली. त्याची दखल घेत खंडपीठाने सुनावणी घेण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार बुधवारी प्रशांत भूषण यांनी सुनावणी घेण्याची विनंती केली, मात्र खंडपीठाने इतर प्रकरणांच्या सुनावणीमध्ये व्यस्त असल्याचे सांगताच प्रशांत भूषण यांनी जोरदार युक्तिवाद सुरू केला. हे प्रकरण लोकशाही वाचवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी तातडीच्या सुनावणीची विनंती केली. त्यावर खंडपीठाने 19 मार्चला सुनावणी निश्चित केली.

### नवीन कायद्याच्या वैधतेची 19 मार्चला होणार सुनावणी

2023 मधील मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त कायद्याच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले आहे. नवीन कायद्यामुळे निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेत केंद्र सरकारची मनमानी चालणार आहे. याबाबत न्यायालय 19 मार्चला सुनावणी घेणार आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनीदेखील नवीन कायद्याला आव्हान दिले आहे.

### केंद्राच्या वकिलांची कोर्टात चालढकल

अ‍ॅड. प्रशांत भूषण यांनी सुनावणीची विनंती केली. यावेळी न्यायालयाने त्यांना एका प्रकरणानंतर सुनावणी घेऊ, असे सांगितले. याचदरम्यान केंद्र सरकारतर्फे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी मधेच हस्तक्षेप केला आणि आपण दुसऱ्या प्रकरणात व्यस्त असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. त्यावर प्रशांत भूषण संतप्त झाले. महाधिवक्ता दुसऱ्या कोर्टात असतील म्हणून प्रत्येक प्रकरण पुढे ढकलले जाऊ शकत नाही. केंद्र सरकारकडे 17 विधी अधिकारी आहेत, असे सांगत प्रशांत भूषण यांनी जोरदार आक्षेप घेतला.

### देशातील 140 कोटी जनतेवर परिणाम

आम्ही निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेला आव्हान दिलेले आहे. त्यावरील सुनावणी प्रलंबित असताना जर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती पूर्णपणे सरकारमार्फत केली जाणार असेल तर याचा देशातील 140 कोटी जनतेवर परिणाम होईल. हा लोकशाहीला धोका आहे. एक प्रकारची लोकशाहीची थट्टा चालवली जात आहे, असा सडेतोड दावा अ‍ॅड. प्रशांत भूषण यांनी केला.

# थोरला मंगळवेढा तालीम मंडळाच्या उपक्रमात २५ हजार शिवभक्तांना जेवणाच्या तृप्तीची ढेकर !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सोलापुरातील थोरला मंगळवेढा तालीम मंडळाच्यावतीने बुधवारी राबविण्यात आलेल्या शिवभोजन उपक्रमामध्ये सुमारे २५ हजाराहून अधिक शिवभक्तांनी तृप्तीची ढेकर दिली . 25 हजाराहून अधिक शिवभक्तांना थोरला मंगळवेढा तालीमच्यावतीने मिष्ठांन्न जेवण देण्यात आले आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी यंदाच्या वर्षीसुद्धा शिवभक्तांना पोटभर जेवण देण्याचा उपक्रम पार पडला. थोरला मंगळवेढा तालमीचे आधारस्तंभ आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, कुशल संघटक संकेत भाऊ पिसे, व अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या शिस्तबद्ध नियोजनाच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रात्री उशिरापर्यंत जेवणाच्या पंगती सुरू होत्या.

पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांच्या हस्ते शिवपुजन करून शिवभोजन उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

याप्रसंगी सोलापूर शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे जन्मेजयराजे भोसले, कोल्हपूरचे माजी महापौर सागर भाई चव्हाण, रीपाईचे राजाभाऊ सरवदे, सुयश गुरुकुलचे केशवराव शिंदे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे साहेब, चंद्रकांत वानकर, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे साहेब, दिनेशजी मलपे, मनोज शेजवाल, संकेत पिसे, अनिकेत पिसे, सागर पिसे, विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, प्रकाश वाले, राजशेखर हिरेहब्बू, लक्ष्मीदास सोनकवडे, हरिभाऊ चौगुले, मसरे काका, शहाजीराजे पवार, पुरुषोत्तमजी बरडे, बिजू अण्णा प्रधाने, विकास गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दरवर्षी सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी होते. सोलापुरात शिवजयंतीच्या लक्षवेधी मिरवणुका निघतात. या मिरवणुका पाहण्यासाठी सोलापूर शहरासह आजूबाजूच्या गावातील तसेच ग्रामीण भागातील शिवभक्त सोलापुरात येतात. भर दुपारी शिवभक्त सोलापुरात येतात आणि रात्री उशिरा आपापल्या घरी जातात. मात्र घरी जाताना त्यांचे जेवणाचे आबाळ होतात. ही गैरसोय लक्षात घेऊन मंडळाचे संस्थापक अमोल बापू शिंदे यांनी शिवाजी महाराजांच्या मिवणुकीला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी शिवभक्तांना पोटभर जेवण देऊन शिवभक्तांना तृप्त करण्याचा उपक्रम अनेक वर्षापासून सुरु केला . सुरवातीस ५ हजार, ७ हजार शिवभक्तांना आणि नंतर शिवजन्मोत्सव निमित्त शिवभक्तांसाठी आणि बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस बांधवांसाठी जेवण देण्यास सुरुवात केली. मागील वर्षी २१ हजार शिवभक्तांनी भोजनाचा आस्वाद घेतला. यंदा २५ हजाराहून अधिक शिवभक्तांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. या उपक्रमाचे संपूर्ण महाराष्ट्रभर कौतुक होत आहे .मिरवणुक बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीस बांधवांची बंदोबस्तावेळी होणारी जेवणाची गैरसोय लक्षात घेऊन पोलीस बांधवांसाठी स्वतंत्र व्यवस्था थोरला मंगळवेढा तालीम संघाकडून करण्यात आली होती.

बुधवारी १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौकातील यात्री कॉटेज येथे बाजी आण्णा मठाजवळ शिवभक्तांना टेबल खुर्चीवर शिवभोजन देऊन राबविण्यात आला.थोरला मंगळवेढा तालीम मंडळ आणि अमोल बापू शिंदे मित्र परीवारानं हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न केले.

### जेवनामध्ये हा होता मेनू !

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने सोलापूर शहरात निघणाऱ्या जल्लोषपूर्ण मिरवणूका पाहण्यासाठी येणाऱ्या हजारो शिवभक्तांना जेवन देताना ते अत्यंत सात्विक असावे या दृष्टीने मंडळाचे संस्थापक अमोल बापू शिंदे यांनी उत्तम नियोजन केले. जेवणाच्या ताटात पुरी, दोन भाज्या, मसाला भात आणि गोड शिरा हा मेनू देऊन शिवभक्तांनी या शिवभोजनाचा लाभ घेतला. सुमारे 25 हजाराहून अधिक शिवभक्त या भोजनाचा लाभ घेणार असल्यामुळे बुधवारी सकाळपासूनच आचारी मंडळींनी स्वयंपाक तयार करण्यासाठीची लगबग सुरू होती.




### शिवाजी महाराजांचा आदर्श

“ छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याचा गाडा हाकताना एकही मावळा उपाशी राहणार नाही याची काळजी घेतली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे तेच संस्कार आणि दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून सोलापुरात शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने मिरवणूका पाहण्यासाठी येणाऱ्या शिवभक्तांची अडचण लक्षात घेऊन मिरवणुकीला संपूर्ण फाटा देत गेल्या काही वर्षापासून शिवभक्तांना भरपेट जेवन देण्याचा उपक्रम सुरू केला. सुरुवातीला सात हजार शिवभक्तांना जेवन देण्यात आले. मात्र दुसऱ्या वर्षापासून बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस बांधवांनासुद्धा त्यामध्ये सामावून घेत यंदाच्या वर्षी शिवभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन 25 हजार शिवभक्तांना जेवण देण्याचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला, याचा मनोमन आनंद वाटतो. मंगळवेढा तालीम संघाचे सर्व सहकारी या उपक्रमामध्ये अहोरात्र झटतात. त्या सर्वांना या उपक्रमाचे श्रेय जाते. आपल्या शेवटच्या श्वासा पर्यंत हा उपक्रम आगामी काळातसुद्धा आणखी चांगल्या पद्धतीने राबविण्याचा आपला माणस आहे

**– अमोल बापू शिंदे,** शिवसेना जिल्हाप्रमुख, सोलापूर

# महिलांना ५० टक्के सवलत दिल्याने एस टी तोट्यात ! परिवहन मंत्र्याचा अजब दावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिलांना एसटी प्रवासात 50 टक्के सवलत देण्याची योजना जाहीर करण्यात आली. यानंतर महिलांनी मोठ्या प्रमाणात एसटीने प्रवास केल्याची आकडेवारी महायुतीच्या नेत्यांनी जाहीर केली होती. या योजनेमुळे एसटी तोट्यात गेल्याचा आरोप विरोधकांकडून राज्य सरकार वारंवार करण्यात आला. पण राज्य सरकारने वेळोवेळी हे आरोप फेटाळले होते. मात्र आज अखेर यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी अजब दावा केला आहे. काय म्हणाले प्रताप सरनाईक ? सविस्तर जाणून घेऊया.

### एसटी तोट्यात गेल्याची कबुली

महिलांना देण्यात आलेल्या सवलतीमुळेच एसटी तोट्यात गेल्याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी दिली. महिला आणि ज्येष्ठांना एसटी प्रवासात सवलत देण्यात आली. यामुळे एसटीला दर दिवशी 3 कोटी रुपयांचा तोटा होतोय, असे सरनाईक म्हणाले. त्यामुळे यापुढे एसटीमध्ये कोणतीच सवलत नाही असं वक्तव्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्ये केले.

### 'एसटी महामंडळाच्या ताफ्यातील 60 टक्के एसटी बस भंगार'

एसटी महामंडळाच्या ताफ्यातील साठ टक्के एसटी बस भंगार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. भाडेवाढ केल्यामुळे एसटीचा तोटा कमी झाला, एसटी सुरळीत व्हायला दोन ते तीन वर्षे लागतील, असे ते म्हणाले. पाच वर्षापूर्वी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यासंदर्भात कोणतीही चर्चा झाली नव्हती खासदार संजय राऊत यांच्या म्हणण्याला काही एक अर्थ नाही, असे म्हणत प्रताप सरनाईक यांनी खासदार संजय राऊत यांचा दावा फेटाळला.



### 'सध्या सुरु असलेली सवलत बंद होणार नाही'

व्हाईस ऑफ मेडिया या पत्रकार संघटनेच्या कार्यक्रमात पत्रकारांना एसटीमध्ये सवलत द्या अशी मागणी सरनाईक यांच्याकडे करण्यात आली यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सवलतीमुळेच एसटी बस तोट्यात गेल्याचे वक्तव्य केलं. या वक्तव्यामुळे महायुती सरकारच्या एसटी प्रवासात महिलांच्या सवलत योजनेमुळेच एसटी तोट्यात गेल्याची कबुली जणू परिवहन मंत्री यांनी दिल्याचे बोलले जात आहे.सध्या सुरु असलेली सवलत बंद होणार नाही. पण आता नवी सवलत देण्यात येणार नाही.

# सांगोल्यातील ७५ हजार शेतकऱ्यांना दोन वर्षांनी मिळाला निधी

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** खरीप हंगाम-२०२३ मध्ये दुष्काळामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानापोटी मंगळवार अखेर (दि. १८) सांगोला तालुक्यातील ७५ हजार ९४६ बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर सुमारे ११६ कोटी ९६ लाख २९ हजार रुपयांचा दुष्काळनिधी जमा केला आहे. दोन वर्षापूर्वी सांगोला तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप हंगाम २०२३ मध्ये शेतीपिकांच्या नुकसानीपोटी सांगोला तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी १५७ कोटी ७ लाख ६७ हजार रुपयांचा इतक्या रकमेची तरतूद केली होती.आतापर्यंत ७६ हजार ९२४ बाधित शेतकरी खातेदारांच्या ११९ कोटी १६ लाख ३४ हजार ५८३ रुपयांच्या याद्या शासनाच्या पोर्टलवर अपलोड केल्या आहेत. ५ लाख ४१ हजार ६७५ रुपयांचा निधी प्रलंबित आहे. ३४ खातेदारांची ई-केवायसी झाल्यानंतर निधी प्राप्त होणार आहे. आजअखेर ७५ हजार ९४६ शेतकऱ्यांच्या खात्यावर ११६ कोटी २६ लाख २९ हजार ५३ रुपयांचे दुष्काळ अनुदान जमा आहे.

### पाच हजार हेक्टरांचे नुकसान

सांगोला तालुक्यात खरीप हंगाम २०२३ मध्ये २ हेक्टर मर्यादित ४४ हजार ०६७हेक्टर जिरायत, २१ हजार ५४३ हेक्टर बागायत, १४ हजार १९९ हेक्टर बहुवार्षिक पिके असे ७९ हजार ८१० हेक्टर पिकांचे तसेच २ ते ३ हेक्टर मर्यादेत २४ हजार ०६५ हेक्टर जिरायत, १० हजार ३६१ हेक्टर बागायत, ५ हजार ७६७ हेक्टर बहुवार्षिक पिके असे ४० हजार २९३ हेक्टर पिकांचे, तर २ हेक्टर मर्यादेत (२२४५-२४३४) ३ हजार ७४५ हेक्टर जिरायत, ३ हजार ६६२ हेक्टर बागायत, ३ हजार १९४ हेक्टर बहुवार्षिक पिके असे १० हजार ६०३ हेक्टर पिकांबरोबर २ ते ३ हेक्टर मयार्देत (२२४५-२१६७) २ हजार ९४५ हेक्टर जिरायत, १ हजार ७६१ हेक्टर बागायत, १ हजार २९७हेक्टर बहुवार्षिक पिके असे एकूण ५ हजार १०४ हेक्टर पिकांचे नुकसान झाले होते.

# सोलापूरचा पारा ३८ अंशांवरः उन्हाचा चटका वाढला; यावर्षीचा उन्हाळा चिंताजनक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर व परिसरातील तापमानाचा पारा गेल्या काही दिवसांपासून ३७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहत होता. यंदाच्या उन्हाळयातील सर्वाधिक ३८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद आज झाली. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यातच सोलापूरच्या कमाल तापमानाचा पारा ३८ अंशांवर पोचल्याने यंदाच्या उन्हाळयाबाबत चिंता व्यक्त होऊ लागली आहे.

सोलापूर परिसरात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढू लागला आहे. वाढत्या उन्हामुळे वातावरणातून थंडी आणि गारवा गायब झाला आहे. सकाळी १० वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवण्यास सुरवात होते. दुपारच्या सुमारास उन्हाचा चटक अधिक असल्याने उन्हापासून बचाव केला जाऊ लागला आहे. उन्हाचा कडाका वाढल्यामुळे उकाडाही वाढू लागला आहे.

मकर संक्रांतीनंतर उन्हाचा कडाका हळूहळू वाढण्यास सुरवात होते. होळीनंतर उन्हाचा कडाका अधिक तीव्र होत असल्याचा आजपर्यंतचा अनुभव आहे. या वर्षी होळी १३ मार्च रोजी आहे. होळीपूर्वीच सोलापूरच्या तापमानाने ३८ अंश सेल्सिअसचा पारा गाठला आहे. उन्हाळ्यात सोलापूरच्या तापमानाचा पारा ४१ ते ४२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहत असल्याच्या आजपर्यंतच्या नोंदी आहेत. यावर्षी जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात पाण्याची फारशी टंचाई भासण्याची शक्यता नाही. प्रशासनाने तरी देखील ऐन वेळची परिस्थिती पाहून टंचाईच्या उपाययोजना राबविण्याची तयारी करून ठेवली आहे.

## संपादकीय

# आहे मनोहर तरी

मराठी साहित्यात 'आहे मनोहर तरी गमते उदास' अशी प्रचलित म्हण आहे. सर्व काही चांगले असतानाही विनाकारण उदास भावना निर्माण करणारी मनस्थिती या म्हणीतून समोर आणली जाते. सध्या महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे जे सरकार आहे त्या सरकारच्या एकूण कारभाराबाबत आणि मनस्थितीबाबतसुद्धा ही म्हण चपखल बसते असे सध्या तरी दिसत आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राज्यातील मतदारांनी महायुतीवर मोठ्या प्रमाणात विश्वास दाखवून प्रचंड असे बहुमत महायुतीच्या पाठीशी उभे केले असूनही या महायुतीचे नेतृत्व करणारे जे तीन प्रमुख नेते आहेत व या नेत्यांच्या नेतृत्वाखालील जे त्या पक्षाचे आमदार आणि कार्यकर्ते आहेत त्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये केलेली विधाने असो किंवा कारवाया असो ते पाहता सर्व काही आलबेल आहे असे म्हणता येत नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रालयात पत्रकार परिषदेमध्ये बोलताना आमच्यामध्ये कोणतेही 'कोल्ड वॉर' नाही असे स्पष्टीकरण दिले असले तरी आणि सरकारमध्ये कोणतीही समांतर यंत्रणा कार्यरत नसल्याचा खुलासा केला असला तरीही मुख्यमंत्रिपद गेल्यावर आणि उपमुख्यमंत्रिपद मिळाल्यावर एकनाथ शिंदे नाराज आहेत हे अजूनही लपून राहिलेले नाही. गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या अनेक महत्त्वाच्या बैठकांना त्यांनी दांडी मारली आहे. त्याशिवाय मंत्रालयात एक मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष असताना उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष हा नवीन उपक्रमही त्यांनी सुरू केला आहे.

सरकारी पातळीवर आयोजित काही बैठकांना अनुपस्थित राहून त्याच कालावधीमध्ये एकनाथ शिंदे यांनी पक्षीय पातळीवर काही बैठकांना हजेरी लावली होती अशाही गोष्टी समोर आल्या आहेत. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा शिवसेनेच्या आमदारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही माजी आमदार आणि खासदारांची सुरक्षा व्यवस्था कमी केली आहे. एवढेच नाही तर गेल्या मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा आधीच बाहेर आल्यामुळेही मुख्यमंत्र्यांनी संताप व्यक्त केला असून अशा प्रकारे पुन्हा घटना घडल्या तर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. दुसरीकडे अजूनही रायगडसारख्या जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचे घोंगडे भिजत असताना महायुतीच्या नेत्यांमधील मतभेद वाढणारे नवनवीन विषय समोर येत असतील तर ही यंत्रणा विस्कळीत होण्यास वेळ लागणार नाही.

या सर्व घडामोडींमध्ये दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मात्र कौतुक करावे लागेल. कारण महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर सर्वात समतोल पद्धतीने आणि सर्वांना सामावून घेण्याचे काम अजित पवारच करत असल्याचे दिसत आहे. जरी मस्साजोगच्या सरपंचाच्या हत्येवरून त्यांचे जवळचे मंत्री सहकारी धनंजय मुंडे यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले असले तरी त्या विषयावरूनसुद्धा अजित पवार यांनी सावध भूमिका घेतली आहे. महत्त्वाचे म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष किंवा एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना या पक्षांसोबत कोणताही संघर्ष होणार नाही याची काळजीपूर्वक दक्षता अजित पवार घेताना दिसत आहेत.

मध्यंतरी राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जरी शिवसेनेत प्रवेश केला असला, तरी त्याबाबतही अजित पवार यांनी मवाळ भूमिकाच घेतली होती. अशा प्रकारे युतीच्या सरकारमध्ये अनेक महत्त्वाचे नेते सरकारचे नेतृत्व करत असतात तेव्हा सर्वच नेत्यांनी आणि त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी काळजीपूर्वक वागणे गरजेचे असते. एकनाथ शिंदे यांना आपल्या देहबोलीतून आणि कार्यशैलीतून आपण नाराज नाही हे दाखवू द्यावेच लागणार आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवनेरी किल्ल्यावर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकत्र आल्यामुळे जनमानसात थोडाफार चांगला संदेश गेला असला तरी ही प्रक्रिया आगामी कालावधीमध्येसुद्धा चालू ठेवावी लागणार आहे.

महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी तीन दिशेला तीन तोंडे करून जर कारभार केला तर मतदारांचा विश्वासघात केल्यासारखेच होणार आहे. आगामी कालावधीमध्ये महापालिका निवडणुकीची शक्यता असल्याने आणि त्या पाठोपाठ इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने महायुतीच्या नेत्यांमध्ये पुन्हा एकदा वादाचा प्रसंग समोर येण्याची शक्यता आहे. प्रत्येक पक्ष स्वबळाची भाषा करत असल्याने हा वाद होणे साहजिकच आहे. पण हा वाद अतिरेकी टोक गाठणार नाही याची काळजी सर्वच नेत्यांना घ्यावी लागणार आहे.

अनेक वेळा काही नेते किंवा कार्यकर्ते त्यांच्या विधानांमुळे आणि कामांमुळे पक्षाला किंवा नेत्याला संकटात टाकण्याचे काम करत असतात याबाबतसुद्धा काळजी घ्यावी लागणार आहे. मतदारांनी एवढे मोठे बहुमत देऊनसुद्धा आनंदाची किंवा उत्साहाची भावना सरकारमध्ये नाही अशा प्रकारची टीका नेहमीच विरोधी पक्षांकडून केली जाते. ही टीका जर खोडून काढायची असेल तर सर्वच प्रमुख नेत्यांना आपल्या कार्यशैलीमध्ये बदल करावा लागणार आहे. तरच सत्ताकारणाचे हे चित्र अधिक मनोहारी दिसू लागेल आणि उदासी कमी होईल.

# बार्शीत दिली एकाच वेळी १०५ विद्यार्थ्यांनी शिवगर्जना



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्यात प्रथमच बार्शी मध्ये एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांना ३९५ व्या जयंतीनिमित्त मानवंदना दिली. बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालय परिसरातील अश्वारूढ असलेल्या महाराजांच्या पुतळ्यासमोर व बार्शीतील शिवसृष्टी या दोन्ही ठिकाणी एकत्र येत १०५ मुला मुलींनी मिळून एक साथ गारद (शिवगर्जना) दिली. यामध्ये कुमारी - आरोही अमोल शहाणे व पोतदार इंग्लिश मिडीयम स्कूल चे १०४ विद्यार्थी सहभागी होते. गारद हि एकच व्यक्ती देते व बाकी लोक जयघोष करतात हे आतापर्यंत आपण अनेक ठिकाणी पाहत आलोत.पण एका तालात - सुरात १०५ विद्यार्थ्यांनी गारद दिली तेंव्हा संपूर्ण परिसरात उभ्या असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या अंगावर काटा आला.एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी एकत्र येत गारद देणं हि राज्यातील पहिलीच संकल्पना आहे. शालेय विद्यार्थीना शिवगर्जना अर्थासहित संपूर्ण पाठ असावी हा हेतू यामागे होता.हि आगळीवेगळी संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी साठी बाळासाहेब देशमुख, कु.अमृता रंगदळ, पोतदार इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व कर्मचारी तसेच अमोल शहाणे व भावना शहाणे, आदींनी परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवरायांचे महिलांविषयीचे उदात्त धोरण

छत्रपती शिवरायांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करताना एका गोष्टीची प्रकर्षाने खंत वाटते ती म्हणजे महिला संरक्षण... रोज सकाळी पेपर उघडला की महीला अत्याचाराच्या किमान दोनचार बातम्या नजरेस पडतात, का होत असावं असं? संस्काराचा अभाव, महीलांना दिलं जाणारं कनिष्ठ स्थान, आपआपसातील लोप पावलेली आपूलकी, कायदा व्यवस्थेची कमी होत चाललेली जरब, अपूरी सुरक्षा व्यवस्था या आणि अशा अनेक अंगाने याचा विचार करावा लागेल... पण खास करुन शिवरायांच्या स्वराज्यातील महीला धोरणांचा आभ्यास केला तर याला पायबंद घालणे सोपे जाईल याची खात्री वाटते.

आपण शिवपुर्व काळाचा विचार केला तर अत्यंत भयानक व भयावह अशी परिस्थिती होती. मुगल, आदिलशाही, निजामशाही, बरिदशाही आदी मोठी साम्राज्य होती, यांच्याकडे काम करणारे सरदार, वतनदार, इनामदार आदी मंडळी स्वतःच्या परगण्यामधे राजे म्हणून वावरत होते. एकमेकांचा प्रदेश बळकावणे, लूट करणे, अतिरेकी महसुल गोळा करणे या सातत्याने होणाऱ्या गोष्टींमुळे रयत हैराण होती पण याही पेक्षा भयंकर म्हणजे स्त्रीयांवर होणारे अत्याचार मन सुन्न करुन टाकणारे होते.

हे सारं संपविण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ आणि शहाजी राजांनी स्वराज्याचा संकल्प केला. हा संकल्प पुर्ण करण्यासाठी शिवबांना संस्कारीत, प्रशिक्षित करण्यात आले. रयतेवर आणि महीलांवर होणारा अन्याय दूर करणे या प्रमुख उद्देशाने प्रेरित होउनच स्वराज्य रचनेची सुरवात झाली. आई वडीलांना श्रद्धास्थानी ठेऊन शिवबांनी आपल्या शिवकार्यास सुरवात केली.

१६४२ ला जिजाऊ माँसाहेब आणि शिवबा पुण्याला आले. बेचिराख झालेल्या पुण्यामधे सोन्याचा नांगर चालविला आणि पुण्याचं नंदनवन केले. मावळ प्रांतात डोंगर दऱ्यामधे, कडेकपाऱ्यावर जाऊन शिवबांनी रयतेची दुखः जाणून घेऊन, त्याबात जिजाऊंशी सखोल चर्चा केली आणि उपाय योजना सुरु केली हा शिवबांचा नित्यक्रम होता. रयतेच्या या दुःखामधे महिलांच्या आर्त किंकाळ्या ऐकून जिजाऊ व्याकुळ होत होत्या आणि तितक्याच संतापतही होत्या. शिवरायांनी जिजाऊंच्या वेदना आणि संताप लक्षात घेऊन प्राधान्याने महिला संरक्षणासाठी कडक धोरण अवलंबिले. गावागावात, वाड्यावस्त्यावर, पाड्यावर जाऊन तरुण मावळ्यांना ग्राम संरक्षणासाठी तयार केलं, त्यांच्यामधे एकजूट केली, त्यांना शस्त्रं दिली. महिलांच्या संरक्षणाची पुर्ण जबाबदारी दिली आणि महिला अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी कडक शिक्षेची तरतूद केली. अत्याचार करणारा कोणीही असो मग तो स्वराज्यातील असो की शत्रू सैन्याचा असो सर्वांना नियम सारखेच. यासोबतच स्वराज्यातील सैन्याला सक्त ताकीद होती की शत्रूच्याही

स्त्रियां बरोबर बदअमंल केल्यास कठोर शिक्षा केली जाईल. फौजेतील धारकऱ्यांना स्पष्ट आदेश होते की दवडीत बायाबापड्या वर हात टाकणे या बाबी ने गैरबाका झाल्यास हात कलम केले जातील. मोहिमेवर जाताना लष्करातील लोकांनी बायको बरोबर घेऊ नये त्याच बरोबर बटकीन अथवा कलावंतीन सोबत बाळगल्यास गर्दन मारण्यात येईल असे आदेश दिलेले होते. शिवरायांच्या या कडक धोरणामुळे स्वराज्यातील सैन्यात महिलांविषयी आदर भावना निर्माण झाली. जिजाऊ माँ साहेबांनी दिलेली उदात्त आचरणाची शिकवणूक व संत तुकाराम महाराजांनी केलेल्या उपदेशाचा शिवरायांवर मोठा प्रभाव होता संत तुकाराम महाराजांच्या आचरणातला एक अभंग हे दर्शवतो "पराविया नारी आम्हा रखुमाई समान हे गेले नेमून ठायीचेयी !!
जाई वो तू माते न करीच सायास!
आम्ही विष्णुदास नाही ऐसे !!
शिवरायांचं मुख्य श्रद्धास्थान जिजाऊ माँसाहेब असल्यामुळे



आणि माँ साहेबांच्या संस्कारामुळे शिवरायांनी स्वराज्य व्यवस्थेमध्ये महिलांना उच्च स्थान दिले होते, महिलांना तितकेच स्वातंत्र्यही दिले होते, वेळप्रसंगी महिलांचा सन्मान व सत्कार केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात नोंद केली आहेत. हिरकणी बुरुजाचा इतिहास सर्वश्रुत आहे रायगडाच्या पायथ्याशी राहणारी हिरकणी नावाची सर्वसामान्य स्त्री दूध विक्रीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते होती एकदा दूध विक्रीसाठी गेलेल्या हिरकणीस गडावर उशीर झाला गडाचे दरवाजे बंद झाले शिवरायांच्या कडक आदेशामुळे सूर्यास्तानंतर दरवाजे उघडण्यास परवानगी नव्हती, हिरकणीचे लहान बाळ भुकेने व्याकुळ होतं त्याला दूध पाजण्यासाठी हिरकणी च्या जीवाची उलघाल होत होती, गडाचे दरवाजे उघडत नाही असं लक्षात आल्यानंतर हिरकणी एका कड्यावरून खाली उतरते अत्यंत अवघड कठीण काट्याकुट्यांनी व्यापलेला असा तो कडा हिरकणी बाळाच्या प्रेमापोटी धाडसाने उतरते बाळाला दूध पाजल्यानंतर ती निश्चिंत होऊन झोपी जाते. सकाळी शिवरायांना ही बातमी कळते तेव्हा तिला दरबारात बोलावलं जातं. हिरकणी मनातून खूप घाबरते, शिक्षा होणार या भीतीने गडावर जाते पण तिचं शौर्य बाळा पोटी असणारी माया आणि प्रसंगानुरूप घेतलेला निर्णय याचं कौतुक करून शिवरायांनी तिला साडी चोळीचा मान दिला आणि अशा धाडसी माता आमच्या स्वराज्यात आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो असं मनापासून कौतुक केलं. एवढेच न करता जिथून हिरकणी खाली उतरली त्या कड्यावर मोठा बुरुज बांधून त्या बुरुजाला हिरकणीच नाव दिलं. स्त्रियांबद्दल असणारा हा आदरभाव शिवरायांच्या अनेक निर्णयातून दिसतो.

जेंव्हा शिवराय नुकतेच मावळ प्रांतात स्थिरस्थावर होत होते त्याच वेळी रांज्याच्या गुजर पाटलाने एका मुलीवर अत्याचार केला. त्या गरीब मुलीने आत्महत्या करून आपला जीव दिला, ही बातमी शिवरायांना समजल्या समजल्या त्या गुजर पाटलास अटक करून गडावर पाचारण केले आणि त्याच्या गुन्ह्याची शहनिशा करून त्याला चौरंग्या बनवण्याची शिक्षा दिली चौरंग्या याचा अर्थ दोन्ही हात व दोन्ही पाय कलम करून कलम करणे. या शिक्षेमुळे पुन्हा कोणीही असा अपराध करू नये ही जरब लोकांमध्ये बसली.

असाच आणखी एक प्रसंग आहे वसई पासून राजापूर पर्यंतचा सागरी किनारा शिवाजी राजांच्या ताब्यात आला परंतु पनवेल जवळ प्रबळगड हा आदिलशहाचा किल्ला अजून ताब्यात आला नव्हता म्हणून राजांनी आदेश दिले की हा किल्ला सर करावा. तिथे केसरी सिंह नावाचा किल्लेदार निकराची झुंज देत होता अखेर या लढाईत तो मारला गेला, तिथे सोन्यासह विपुल असा गुप्तधनाचा शोध लागला परंतू त्याच वेळेस शिवरायांना समजले की केसरीसिंहाची आई व दोन मुले घाबरून लपून बसले आहेत, शिवरायांनी त्यांना बोलावून घेतले त्यांना पालखीचा मान दिला व संपूर्ण संरक्षणासह त्यांच्या देऊळगाव या मूळ गावी पाठवले, अशाच प्रकारे सोळाशे अष्ट्यात्तर साली स्वराज्याच्या सेनापतीने नेवाडीच्या किल्ल्याला वेढा दिला होता. या किल्ल्याची किल्लेदार सावित्रीबाई देसाई ही स्त्री होती या बहादूर स्त्रीने सलग सत्तावीस दिवस किल्ला लढवला पण शेवटी आपल्या सेनापतींनी किल्ला जिंकला आणि विजयी

उन्मादाने उन्मत होऊन सूड भावनेने सावित्रीबाईवर अत्याचार केला. शिवाजी महाराजांना ही बातमी समजली तेंव्हा ते संतापले आणि सदर सेनापतीचे डोळे काढण्यात यावे असे फर्मान काढले व जन्मभर त्याला तुरुंगवासाची शिक्षा दिली, याच पद्धतीने मोगल सरदार उदाराम राजे देशमुख यांच्या विधवा पत्नी रायबागीण अटकेत सापडल्यानंतर त्यांनाही वस्त्रे जवाहर देऊन सन्मानाने औरंगाबादला सुरक्षित पोहोचविले. कर्नाटक मोहिमेच्या वेळी बेलवडीच्या राणी मल्लंमा सोबत गैरवर्तन केल्याबद्दल फौजेतील अधिकाऱ्यास कठोर शिक्षा केली, मल्लंमा राणीस स्वतःच्या बहिणीसमान वागणुक दिली व तिची गढी पुन्हा त्यांच्या स्वाधीन केली. अशा अनेक घटना शिवरायांच्या जीवनात घडल्या. स्वराज्याबरोबरच परकीय राज्यातही शिवरायांच्या स्त्री विषयीच्या उदार नैतिक धोरणाची चर्चा होती. शिवरायांचा कट्टर शत्रू औरंगजेब याने राजांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्त्री याविषयीच्या उदार धोरणाविषयी गौरवोद्गार काढले आहेत "आपल्या हातात पडलेल्या शत्रूच्या स्त्रियांच्या अब्रुची कदर करणारा एक महावीर मरण पावला." शिवरायांनी कुटुंबातील सर्वच महिलांना निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेतले होते जिजाऊंचे मार्गदर्शन , आठ राण्यांचे सल्ले तर सुनबाईचा सहभाग या सर्व बाबी शिवरायांचा स्त्रियांबाबत असणारा उदात्त दृष्टिकोन दर्शवतात. संभाजी राजांच्या पत्नी येसू राणीसाहेब यांना "सखी राणी जयती" असा शिक्का मोर्तब बहाल केला व स्वराज्याच्या कुळमुखत्यार म्हणून त्यांना अधिकार दिले. शिवरायांनी स्वतःच्या मुलींना सुद्धा स्वराज्य सेवेत सामावून घेतले होते, वैदिक धमार्ने शूद्र ठेवलेल्या स्त्रियांना शिवरायांनी सन्मानाची व नैतिकतेची वागणूक दिली. माँसाहेब जिजाऊ यांच्या संस्कारातून शिवरायांची जडणघडण झाली असल्याने स्वराज्य स्थापन करत असतानाच शिवरायांनी आपल्या सैन्याला सांगितलं होतं कि "ज्याला यश पाहिजे त्याने स्त्री अभिलाषा धरू नये स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील देवता आहे या देवतेचा आपण आदर केला पाहिजे" हीच शिवरायांची भूमिका मावळ्यांच्या आणि रयतेच्या मनामनात रुजली होती, दृढ झाली होती म्हणून शिव काळामध्ये महिलेवर अत्याचार या घटना घडण्याचे बंद झाले. महीला भयमुक्त झाल्या. शिवरायांचे कायदेकानून आणि निर्णयाची जरब केवळ स्वराज्यातील रयते पुरती मर्यादित नव्हती तर परकीय राज्यांमध्ये, शत्रुसैन्यामधेसुद्धा मोठ्या प्रमाणात होती आणि म्हणूनच त्याकाळात कदाचित स्त्रियांना आरक्षण नव्हते पण 100% संरक्षण होते.

आजच्या पिढीने शिवजन्मोत्सव साजरा करत असताना आपल्या घरातील परिसरातील गावातील शहरातील पर्यायाने देशातील स्त्रियांचा आदर सन्मान यासह संरक्षण करण्याची शपथ घेतली पाहिजे तर खऱ्या अर्थाने शिव विचार आम्हा सर्वांच्या मनात रुजला असे म्हणता येईल. आजच्या स्त्रियांच्या असुरक्षिततेवर मात करण्यासाठी समाज, सरकार, न्यायव्यवस्था, प्रसार-प्रचार माध्यम व्यवस्था, शिक्षण व्यवस्था आदी माध्यमांनी ठोस भूमिका घेऊन देशांतर्गत असणाऱ्या या अपप्रवृत्तींचा नायनाट करणे अत्यंतिक गरजेचे आहे म्हणून घराघरात शिवचरित्राचे वाचन पारायण होणे अवश्यक आहे. बालसंस्कार, शालेय संस्कार, समाज संस्कार यामध्ये शिवचरित्राचा मोठ्या प्रमाणात सामावेश करावा लागेल.

आज साजऱ्या होणाऱ्या शिव जन्मोत्सवानिमित्त तमाम देशवासियांना शिवभक्तांना जिजाऊ भक्तांना लाख लाख सदिच्छा धन्यवाद !

**- प्रशांत पाटील**
विभागीय अध्यक्ष
मराठा सेवा संघ सोलापूर

## प्रबोधन

# मन आकळेना । समाज कळेना

'रामायण' हे भारताचं आद्य महाकाव्य आहे. आंघोळीसाठी नदीवर निघालेल्या ऋषी वाल्मिकींना एका झाडावर क्रौंच पक्ष्याचं जोडपं प्रेमलीला करताना दिसतं, न दिसतं, तोच त्यातील नर एका पारध्याच्या बाणाने विद्ध होऊन जमिनीवर कोसळतो आणि हे सारं पाहून व्यथित झालेले ऋषी अनुष्टुप छंदातून आपल्या भावना व्यक्त करतात. त्यांचे ते दुःखोद्गार हाच रामायणाचा प्रारंभ आहे. एका लहान दुःखाने एका मोठ्या दुःखान्त महाकाव्याला जन्म दिला. वास्तविक तिथूनच संस्कृत ललित साहित्याचा उगम झाला. काळजाचा ठोका चुकवण्याचं सामर्थ्य रामायणात आहे. पण सीतास्वयंवराचा प्रसंग त्या सर्व प्रसंगांत सर्वाधिक प्रभावी आहे. 'जो शिवधनुष्याला पेलून त्याला बाण लावील, त्याला जानकी वरमाला घालून पती म्हणून स्वीकारील' अशी जनक राजाची घोषणा होते, न होते, तोच ज्याच्या दोन हातांमध्ये इतरांच्या वीस हातांइतकी शक्ती आहे, असा लंकाधिपती रावण शिवधनुष्याला बाण लावण्यासाठी उठताच, जानकीच्याच नव्हे, तर भल्या भल्या बलशाली उपस्थित नरवीरांच्या काळजाचे ठोके नक्कीच चुकले. सारे स्तंभितच झाले. पण रावण शिवधनुष्य उचलण्याच्या घाईत ते अंगावर घेऊनच जमिनीवर पडला आणि साऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. रावणाच्या झालेल्या फजितीला पारावारच नव्हता. आपल्या शक्तीचा ज्याला अंदाज नसतो, अशा फजितखोराला रावण असं म्हणायला हरकत नाही, हाच या कथा-प्रसंगचा बोध आहे.

या संदर्भात विचारवंत-साहित्यिक प्रा. श्री. म. माटे यांचा तत्त्वज्ञांचं दुहेरी धाडस हा लेख आहे. त्यात त्यांनी शिवभक्त रावणाने ईश्वर मानून आणि स्वतःलाच ईश्वर समजण्याचे दुहेरी धाडस करून शिवधनुष्य उचलून स्वतःवर फजिती कशी ओढवून घेतली, ते सांगितले आहे. आपल्या आवाक्याच्या बाहेरची गोष्ट केली, की फजिती होणार, हे तर नक्कीच. भक्तांची फजिती तर प्रत्येक क्षणी होत असते. माटे म्हणतात, 'परमेश्वराचं ज्ञान, साक्षात्कार, आत्मानुभव या शब्दांची अतिपरिचयाने आपण अवज्ञा करीत आहोत.' ईश्वर, आत्मा, साक्षात्कार ह्या शब्दांचा विचार करण्याची कुवत माणसात नाही. तरीही त्यांचाच नको तितका विचार तो करतो आणि सोन्यासारखं आयुष्य मातीमोल करतो. तहानलेलं हरीण उन्हाच्या झळांना पाणी समजून त्यापाठी धावतं, त्यात आणि भक्तांच्या आचरणात काडीइतकाही फरक नाही. ईश्वर हा विषयच असा आहे की, तो पूर्ण असत्य असल्याने, पूर्ण काल्पनिक असल्याने कधी कळणारही नाही आणि त्याच्यामागे लागण्यात अर्थही नाही.

राहाता राहिला दुसरा धाडसी विचार- माणसात ईश्वरी अंश असण्याचा! माणसात किती पराकोटीची हीनवृत्ती आहे, त्याचा पहिल्यांदा शोध घ्यावा. मग तसं विधान करावं. ही तर वरील विचारापेक्षा मोठीच फसगत किंवा फजिती आहे. माटे म्हणतात, 'पण त्या सनातन सत्याने (असते तर) आपणाला राहाण्यासाठी माणसाच्या शरीरापेक्षा जास्त चांगली जागा नक्कीच शोधून काढली असती. माणसाच्या ठिकाणी चंद्राची शांती नाही, सूयार्चं तेज नाही, वायूचं चापल्य नाही, सागराचा अगाधपणा नाही, पर्वताचं स्थैर्य नाही, वेलीचं मार्दव नाही, वृक्षाचा फलभार नाही, भूमीचं धन नाही, .....याच्यापाशी काही नाही. मानवी देह हा ओल्या मातीचा गोळा आहे. असलं मृण्मय घर आत्म्याच्या किंवा परमात्म्याच्या वस्तीला कधी तरी योग्य असेल काय?'

महाराष्ट्रात रावणासारखी, दुविधा में दोऊ गये, माया मिली न राम अशी फजिती पावलेले बरेच ईश्वर अवतार आहेत आणि होऊन गेलेत! पण सावता माळी आणि भक्त पुंडलिक यांच्याहून ते श्रेष्ठ कधीच ठरणार नाहीत. कांदा, मुळा, भाजीमध्ये सावता दंग झाले आणि आई-बाप हे दैवत माझे म्हणणारे पुंडलिक मातृ-पितृ सेवेने कृतार्थ झाले. आत्मा आणि परमात्मा हे अतिदूरचे विषय दूर ठेवून, कष्ट आणि सेवा या सहजसुलभ गोष्टींचा त्यांनी स्वीकार केला. म्हणून इतर फजितखोर ईश्वरी अवताऱ्यापेक्षा ते जास्त थोर आहेत. कारण-

माणूस नि समाज। सृष्टी हे सत्य
बाकीचे असत्य । दूर ठेवा ॥ १
ईश्वर मरू दे । मनाचा घ्या शोध
मन हे अगाध । अभ्यासाया ॥२
हातचे सोडूनी। पळत्याच्या पाठी
लागे जो, फजिती । त्याची होते॥ ३
मन आकळेना । समाज कळेना
व्यवहारी दैना। रोज आहे ॥४
सोडून हे तिन्ही । देवा शोधू जाई
खरे काही नाही। कधी त्याचे ॥५
यज्ञकुंडामध्ये । द्रव्यनाश जसा
जन्म जळे तसा। अध्यात्मात ॥६
पुरे झाला आता। आयुष्याचा नाश
भिडावे प्रश्नास। व्यवहार्य॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# संभाजी आरमारचा शाही पालखी सोहळा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संभाजी आरमारच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शाही पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याचा शुभारंभ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते आ.देवेंद्र कोठे, भाजप युवा मोचार्चे सरचिटणीस मनिष देशमुख,पोलिस आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, कुलगुरू डॉ. प्रकाश महारनवर, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, शाही पालखी सोहळा प्रमुख प्रा.मल्लिकार्जुन परळकर, शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे



उत्सव अध्यक्ष सुशील बनपट्टे, जी.एम. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात पालखीतून छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. पालखीत छत्रपती शिवरायांची मूर्ती आणि भगवतगीता, शिवचरित्र, शंभू चरित्र आणि भारतीय संविधा प्रत सन्मानपूर्वक ठेवण्यात आली.पारंपरिक हलगीच्या, बँजोच्या गजरात हा पालखी सोहळा मार्गस्थ झाला. यामध्ये वारकरी पथकाने जयघोष करीत टाळ मृदंगाचा गजर केला.

# शिवजयंती शिवविचारांची साजरी करा- शिवश्री गणेश नीळ



**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** जिजाऊ ज्ञानमंदिर कोंडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याकार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक गणेश नीळ, प्राचार्या सुषमा नीळ, मुख्याध्यापक वैभव मसलकर, अर्चना औराद, महादेवी माने उपस्थित होते. यावेळी सह्याद्री नीळ, श्रावणी वाघचवरे, ईश्वरी भोसले याविद्यार्थ्यांनी मनोगतातून छत्रपतींच्या कायाची माहिती सांगितली. विद्यार्थी जी पारंपरिक वेशभूषेत आले होते. संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. शिवगर्जना, आरती,पाळणा, पोवाडे यांचे सादरीकरण करण्यात आले तसेच गावात रॅली काढण्यात आली होती. शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगावर आधारित नृत्य सादर करण्यात आले. तसेच पारंपारिक खेळ लेझीमचे विद्यार्थ्यांकडून बहारदार सादरीकरण करण्यात आले. शिवश्री गणेश नीळ यांनी शिवजयंती शिवविचारांची साजरी होणं सर्वात महत्त्वाचे आहे हा विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याकार्यक्रमाचे सुत्रसंचलन शीतल कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन संकेत मोरे यांनी केले.

# वाफळे येथे शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** वाफळे. ता. मोहोळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली, यावेळी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून शिव आरती करण्यात आली यावेळी सरपंच अनिल चव्हाण, भगवान दाढे, शाळा व्यवस्थानपन समितीचे अध्यक्ष अमोल गडेकर, उपाध्यक्ष चेतन जाधव, डॉ. अविनाश दाढे, विलास खोचरे, गणेश जाधव, विकास दाढे,अक्षय वाघ, गणेश चव्हाण, महेश चव्हाण, नाना चव्हाण, उपसरपंच अमिर तांबोळी, शाहु - फुले - आंबेडकर बहुउद्देशिय सामाजिक संस्थापक अध्यक्ष - श्रीकांत (भाऊ) जवंजाळ, शहाजी देवकर गुरुजी, मेजर सिद्धश्वर जाधव, नितीन खडुळ, सागर दाढे, महादेव जवंजाळ, आशिफ तांबोळी, अमर चव्हाण भाऊसाहेब दाढे, प्रदिप जवंजाळ, शहाजी माळी, नामदेव चव्हाण आदी ग्रामस्त उपस्थित होते.

## वात्रटिका

### पैचान कौन...

भिंतीला कान असतात
ऐकले होते कधी काळी...
बैठकीत गुप्तहेर असतात
असे कळले आता या वेळी...
यांच्या बैठकीत घडले ते
बाहेर समजू लागले...
काहीच झाकून नाही राहत
आता उमजू लागले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विवेक लिंगराज नि:स्वार्थी व्यक्तिमत्व - सिईओ कुलदीप जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विवेक लिंगराज नि:स्वार्थी व्यक्तिमत्व होते. त्यांची कल्पकतेची जिल्हा परिषदेत मदत झाली. जिल्हा परिषदे मध्ये काम करीत असताना विवेक लिंगराज यांनी नि:स्वार्थी भावनेने काम केले असे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा परिषद आवारात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस विवेकानंद लिंगराज यांचे निधन झालेने आज अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी व पत्रकार यांच्या वतीने शोकसभा घेणेत आली. प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कै. विवेकानंद लिंगराज यांच्या प्रतिमेस फुले वाहून अभिवादन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, लिंगराज परिवारातील मुलगा अवनीश, मुलगी ओवी, लिंगराज यांच्या भगिनी गीताताई, भावजय शुभांगी लिंगराज यांचे सह, कर्मचारी संघटनेचे पंडित भोसले, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कामगार नेते अशोक इंदापुरे, महसुल कर्मचारी संघटनेचे मार्गदर्शक शंतनू गायकवाड, महासंघाचे राजेश देशपांडे, श्रमिक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे , जिल्हा परिषद बीट पत्रकार संघटनेचे अध्यक्ष शेखर गोतसुर्वे, यांनी श्रध्दांजली पर मनोगत व्यक्त केले.

मराठा सेवा संघाचे अविनाश गोडसे, आरोग्य कर्मचारी संघटनेचे महेश जाधव, पतसंस्था २ चे गिरीश जाधव, कास्ट्राईब संघटनेचे अरुण भाऊ क्षीरसागर, दिनेश बनसोडे, शिवानंद भरले, विरभद्र यादवाड, जिल्हा परिषद पतसंस्थेचे चेअरमन डॉ. एच पी माने, व्हा. चेअरमन सुरेश कुंभार, दयानंद परिचारक, मुत्तुवल्ली, चेतन वाघमारे,पत्रकार यांचे सह सर्व संचालक मंडळ, महिला व पुरूष कर्मचारी शोकसभेस उपस्थित होते. प्रास्तविक चेअरमन डॉ. एच पी माने, केले. सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. आभार नितीन शिंदे यांनी मानले.



**सिईओ जंगम यांनी केले लिंगराज परिवाराचे आदरातिथ्य..!**

शोकसभे साठी आलेले लिंगराज यांचा मुलगा, मुलगी, बहिण व भावजय यांना स्वतः चे सिईओ दालनात बोलावून त्यांना चहापान करून आदरपूर्वक सन्मान करून त्यांचे कुटूंबियांना आधार देणेचे काम सिईओ कुलदीप जंगम यांनी केले. त्यांनतर अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी व्यक्तिशः लिंगराज यांचे कुटूंबियांना बोलून धीर दिला. सामान्य प्रशासन विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी कुटूंबियांना दालनात बोलावून त्यांची संबंधित कागदपत्रे व विमा व इतर बाबींचा पुर्तता वेळेत करणेची ग्वाही दिली.

**विवेक लिंगराज नि:स्वार्थी व्यक्तिमत्व - सिईओ कुलदीप जंगम**

जिल्हा परिषदे मध्ये काम करीत असताना विवेक लिंगराज यांनी नि:स्वार्थी भावनेने काम केले. सहा महिनेचे कालावधीत त्यांची कामाची चिकाटी, दिलेल्या जबाबदारी परिपूर्ण अंमलबजावणी ते करीत. अभिलेख वर्गीकरणाचे काम देखील त्यांनी कटाक्षाने केले. सर्व कर्मचारी यांचे वतीने ते बोलत असत. त्यांचे मध्ये खुप विनम्रता होती. असेही सिईओ कुलदीप जंगम यांनी बोलताना सांगितले.

**लिंगराज यांचे कार्य स्मरणात राहिल- अतिरिक्त सिईओ कोहिणकर**

विवेक लिंगराज यांचे जिल्हा परिषदे प्रशासनात मोठे योगदान आहे. कृषी विभागात काम करीत असताना एखादा मुद्दा ते पटवून सांगायचे. डीबीटी योजनेत त्यांनी क्युआरकोड ही संकल्पना राबवून सर्व योजना एकत्रित आणण्याचे काम केले असून विवेक लिंगराज यांचे कार्य स्मरणात राहिल असे अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी सांगितले.

**..असा अधिकारी पाहिला नाही - पंडित भोसले**

जिल्हा परिषदेत काम करीत असताना विवेक लिंगराज यांनी प्रामाणिकपणे काम केल. असा प्रामाणिक अधिकारी पाहिला नाही. गेल्या ३६ वर्षा पासून त्यांचे मैत्रीचे संबंध राहिले असल्याचे पंतसंस्थेचे मार्गदर्शक व माजी कार्यकारी अभियंता पंडित भोसले यांनी सांगितले.

**अनेकांना भावना अनावर ..!**

जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, माजी कार्यकारी अभियंता पंडित भोसले, महिला कर्मचारी जोत्सनी साठे यांनी मनोगत व्यक्त करताना रडू कोसळले... भावना अनावर झाल्या. लिंगराज कुटुंबीयांच्या डोळे अश्रुने भरले होते.

**विवेक उद्यान नाव देणेची मागणी**

जिल्हा परिषदेचे आवारात जी वृक्ष लागवज झाली आहे च्या मध्ये विवेक लिंगराज यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे हिरवळ निर्माण झाली आहे. त्या विवेक उद्यान असे नाव देणेची मागणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, पत्रकार शेखर गोतसुर्वे यांनी केली.

# वारकऱ्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 395 व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने मेकॅनिक चौक येथे वारकऱ्यांच्या हस्ते शिवमूतीर्ची प्रतिष्ठापना करण्यात आली.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिव विचारांची शिवजयंती साजरा करण्यात येत आहे गाणगापूर ते आळंदी चालत वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गोविंद पानसरे यांचे शिवाजी कोण होता या पुस्तकाचे दोनशे प्रतींचे वाटप शिवभक्तांना करण्यात आले.




यावेळी संभाजी ब्रिगेड चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे महिला शहराध्यक्ष मोनाली धुमाळ उपाध्यक्ष मनीषा कोळी राजनंदिनी धुमाळ पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अरविंद शेळके दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष शेखर चौगुले शहर उपाध्यक्ष फिरोज सय्यद ओंकार कदम बबन डिंगणे लखन पारसे वैभव धुमाळ आकाश नाईकवाडी विकास सावंत आदी उपस्थित होते.

# सोलापूर शहर काँग्रेसच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करुण अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती शिवाजी चौक येथील येथील त्यांच्या पुतळयास शहर अध्यक्ष नरोटे, पुष्पहार अर्पण करुण अभिवादन करण्यात आले.



यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, मा. नगरसेवक विनोद भोसले, प. महाराष्ट्र सेवादल अध्यक्ष सुदीप चाकोते, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, हणमंतू सायबोळू, भीमाशंकर टेकाळे, अनिल मस्के, पशुपती माशाळ, सुमन जाधव, तिरुपती परकीपंडला, रुस्तूम कंपली, चक्रपाणी गज्जम, सागर उबाळे, लखन गायकवाड, धीरज थोरात, नूर अहमद नालवार, गिरिधर थोरात, राजेश झंपले, मल्लिनाथ सोलापूरे, मोहसीन फुलारे, धीरज खंदारे, शोभा बोबे, संध्या काळे, शाहू सलगर, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, रुकैय्यबानु बिराजदार, मार्ता रावडे, पूजा चव्हाण, अभिलाष अच्युगटला, यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बालभारती विद्यालयात छ.शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठा नाका परिसरात असलेल्या सुप्रभात शिक्षण मंडळ संचलित बालभारती विद्यालयात आज छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष शब्बीर शेख सर उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अख्तरबानो शेख मॅडम,विद्यालयाचे मुख्याध्यापक हाजी रिजवान शेख माध्यमिक विभागाचे प्राचार्य इम्तियाज मुल्ला सर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी आदर व्यक्त केला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मा जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा करून उपस्थित मान्यवरांना आपल्याकडे आकर्षित केले.

शिक्षक मनोगतातून इनामदार सर यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांची राजनीती व युद्धनीती याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनिस सर यांनी तर आभार रिजवान शेख सर यांनी मानले.

# परीक्षेस सामोरे जाताना विद्यार्थ्यांकडे आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन हवा - प्रेमपुरी महाराज

**माढा (कटूसत्य वृत्त):-** 21 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या पुणे बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी मनामध्ये न्यूनगंड किंवा नकारात्मक दृष्टिकोन न ठेवता सकारात्मक दृष्टिकोन, भरपूर तयारी करून आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे गेल्यास हमखास उच्च गुणवत्ता व ध्येयप्राप्ती होऊ शकते.सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जे ज्ञान, माहिती, कौशल्ये व संस्काराची शिदोरी दिलेली असते त्यांचे आयुष्यभर जतन करावे.मुलांनी निर्व्यसनी राहून नेहमी सत्संग व सद्गुनी मित्रांच्या सानिध्यात रहावे असे आवाहन मठाधिपती महंत प्रेमपुरी महाराज यांनी केले आहे.

ते आनंदनगर-मानेगाव ता.माढा येथे श्री विठ्ठल ज्ञानपीठ निमगाव (टें) संचलित, श्री संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना बोलत होते.




अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्याध्यापक प्रविण लटके होते.सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर व शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राची लटके, सानिका खोत, अंजली लटके, श्रुती खोत, प्रतिक्षा सदगर, ओम कापसे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

पुढे मार्गदर्शन करताना महंत प्रेमपुरी महाराज यांनी सांगितले की, तुम्ही जीवनात कितीही उच्च पदावर गेला तरी आईवडील व शिक्षकांनी तुमच्यासाठी घेतलेल्या कष्ट व त्यागाचा विसर पडू देऊ नका. आयुष्यात सतत प्रयत्नशील व आशावादी रहा. जरी तुम्हाला कोणाचे चांगले करता आले नाही तर किमान वाईट करु नका.तुमचे व आईवडीलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. फावला व फुरसतीचा वेळ मोबाईल व इंटरनेट मध्ये घालविण्यापेक्षा अभ्यास,भक्ती व सत्कर्मात खर्ची करा असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी पालक प्रतिनिधी दत्तात्रय लटके, वर्गशिक्षक तुकाराम कापसे, तनुजा तांबोळी, शिवाजी भोगे, सुनील खोत, सचिन क्षीरसागर, सुधीर टोणगे, लहू गवळ, सागर राजगुरू यांच्यासह पालक व प्रशालेतील 5 वी ते 10 वीचे विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अंजली लटके हिने केले.आभार श्रुती खोत हिने मानले.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सागर महाजन हे लाभले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात करण्यात आले. याप्रसंगी प्रा आशिष सरकाळे, प्रा सायली बडेकर, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अंकिता पवार तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयात शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्य स्थापना, शिवजयंतीचे महत्व आणि आजच्या पिढीची जबाबदारी, शिवछत्रपतींचे स्वराज्य संकल्पना व आजचा भारत, शिवरायांचे विचार तरूणांसाठी प्रेरणा आदी विषयांवर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की छत्रपती शिवाजी महाराज यांनी अतिशय लहान वयात स्वराज्याची स्थापना केली. यासाठी त्यांनी अनेक परकीय शक्तींशी लढा दिला. आजच्या पिढीने त्यांचे योगदान स्मरण करून त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे. शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रातुन आपण दूरदृष्टी, नेतृत्व, नियोजन, ध्येयप्राप्ती आदी शिकणे आवश्यक आहे असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**Classified - छोटी जाहीरात**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



**(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)**
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोन: 9552619752**
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शिवरायांचा पाळणा कार्यक्रम अक्कलकोट मध्ये उत्साहात संपन्न



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** जय भवानी, जय शिवरायच्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्यावतीने जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना व शिवरायांचा पाळणा कार्यक्रम बुधवारी दीड हजार महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे, मंडळाचे मार्गदर्शक सुरेशचंद्र सूर्यवंशी, श्याम मोरे,बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्यावतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.जुना राजवाडासमोरील शामियाना मंडपात छत्रपती शिवरायांच्या सिंहासनारूढ पुतळ्याची प्रतिष्ठापना बुधवारी सायंकाळी अलकाताई भोसले,सचिवा अर्पिताराजे भोसले,माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, अनुयाताई फुगे,माजी नगरसेविका सोनाली शिंदे,रत्नमाला मचाले, स्मिता कदम, पल्लवी कदम, संगीता भोसले, स्वाती निकम,उज्ज्वला भोसले, पल्लवी नवले, कविता वाकडे, कविता भोसले, रूपा पवार, सखी ग्रुप,वीरशैव महिला मंडळ, जिजाऊ सखी मंच यांच्यासह शहरातील विविध महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आली. न्यासाचे पुरोहित अप्पू पूजारी व सोमनाथ कुलकर्णी यांनी मंत्रांच्या जयघोषात छत्रपतींच्या पुतळ्याचे पूजन केले.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

## सुडोकु - 182

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | 3 | | | | | 2 |
| | 2 | | | | 8 | 9 | 4 | |
| | 4 | 5 | | | 9 | 1 | 7 | 8 |
| 4 | | 9 | 5 | | 6 | | 3 | |
| | | 2 | | | 7 | 8 | | |
| 5 | 3 | 8 | | | | 4 | | 7 |
| 9 | | | 8 | | 5 | 7 | | 4 |
| 6 | 8 | | | | | | 1 | |
| | | | 7 | | 1 | | | 6 |

# महिलांसाठी मोफत फेटा प्रशिक्षणाचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला शराध्यक्षा व वीरशैव कक्कय्या महिला प्रतिष्ठान संस्थापिका अध्यक्षा सौ. संगीताताई जोगधनकर यांनी महिलांसाठी मोफत फेटा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणाचे उदघाट्न जिल्हाध्यक्ष मा. संतोष भाऊ पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जनरल सेक्रेटरी मा.प्रमोददादा भोसले, मध्यच्या अध्यक्षा मा.सौ.अर्चनाताई दुलंगे, दक्षिण विधानसभा अध्यक्ष मा.ज्योती हत्याळीकर, उत्तर विधानसभा अध्यक्ष उमादेवी झाडबुके, ॲड. साहीन शेख, राजेश्री परशेट्टी, जयश्री झाडबुके आदी पदाधिकारी व पूजा होटकर, पायल पोळ, दिपाली जोशी, राणी जोशी, सुवर्णा शितोळे, भारती कोथिंबीरे, पल्लवी चोल्ले, सपना गावडे, सौ. रोहिणी क्षीरसागर, सुजाता नकाशे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# टेंभू, म्हैसाळ योजनेतून सर्व बंधारे भरून देण्यात येणार- चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** रब्बी हंगामासाठी टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करावे, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून येत्या आठवड्यात टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू होणार असून बुद्धेहाळ तलावासह माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. आठवडाभरात टेंभू, म्हैसाळचे आवर्तन सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सध्या सांगोला तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून विहिरी व कूपनलिकांची पाणी पातळी खालावली आहे. नदी, तलाव, बंधारे ओढे, नाले कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी चांगलेच धास्तावले



आहेत. पाणी प्रश्न मार्गी लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली जात आहे. काही ठिकाणी पाण्याअभावी पिके वाळून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या शुभारंभाच्या उद्घाटनासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर हे चिकमहूद येथे आले होते. त्यावेळी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांची भेट घेऊन तालुक्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करून माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तत्काळ पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता राजन रेडियार व टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता सचिन पवार यांच्याशी संपर्क साधून टेंभू, म्हैसाळचे आवर्तन सुरू करण्याच्या सूचना त्यांना दिल्या आहेत. त्यानुसार २५ फेब्रुवारीपासून टेंभूचे योजनेचे आवर्तन सुरू होणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू होणार असल्याने शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

# मातोश्री विद्यालयात पारितोषिक वितरण स्नेहसंमेलन संपन्न

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** सद्संकल्प शिक्षण व समाजसेवा संस्था सोलापूर संचलित मातोश्री माध्यमिक विद्यालय म्हैसगाव ता. माढा येथे वार्षिक पारितोषक वितरण व इयत्ता दहावीच्या वगार्चा शुभेच्छा समारंभ उत्साहात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सद्संकल्प शिक्षण समूहाचे संस्थापक सचिव समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठलरावजी शिंदे सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे,सरपंच सतीश उबाळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील, प्रगतशील बागायतदार अनिल खारे हे होते. यावेळी संविधान गौरव शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप तसेच विविध स्पर्धांमध्ये व परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्रांचे वाटप अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करून दीपस्तंभ वार्षिक अंक 2025चे



प्रकाशन करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील आदर्श विद्यार्थिनी स्नेहल कांतीलाल नरूटे व संस्कृती संतोष वाघमारे यांनी व्यक्त केलेल्या मनोगताने उपस्थितांचे मने जिंकली.

यावेळी बोलताना वामनराव उबाळे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षणाबरोबर सुसंस्कारित पिढी घडविण्याचे आदर्शवत काम आपण करावे असे आवाहन केले. तर संस्थेचे संस्थापक सचिव तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी आयुष्याच्या प्रत्येक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊन यश संपादन करायचे असते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक विनोद वर यांनी केले, सूत्रसंचालन प्रतिभा पांडव यांनी केले.आभार भारत कापरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशिलचंद्र भालशंकर, संजय गायकवाड, रमेश बनसोडे, माधव माने, अशोक कांबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने करण्यात आली.

# नूतन पालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांचा इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त शितल तेली-उगले यांची बदली झाली असून नूतन पालिका आयुक्त म्हणून डॉक्टर सचिन ओंबासे यांनी गुरुवारी त्यांनी आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला. याआधी नूतन पालिका आयुक्त हे धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. दरम्यान इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी नवनिर्वाचित पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांचे स्वागत करीत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुस्तक,पेन, शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.त्याचप्रमाणे मावळते आयुक्त शितल तेली-उगले यांचा देखील यावेळी किसन जाधव यांनी सत्कार केला. सध्या सोलापूर महानगरपालिकेवर प्रशासक असून आपण त्याचे प्रमुख आहात ही महत्त्वाची अत्यंत गरजेचे कामे आहेत, अशी स्वच्छता पाणीपुरवठा



रस्ता वाहतूक वीज आरोग्य व शिक्षण या सह अन्य प्रमुख कामांना आपण प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा नवनिर्वाचित पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे किसन जाधव यांनी व्यक्त केली.सोलापूर शहराच्या विकासासाठी जी सध्या चालू आहेत आणि नव्याने काही कामे सुरू करायचे आहेत यावर आपण विशेष भर द्यावा. सोलापूरकरांच्या अडीअडचणी वेळेत सोडवण्यासाठी देखील आपण प्रयत्नशील राहावे असेही यावेळी किसन जाधव यांनी नवनिर्वाचित पालिका आयुक्तांकडून अपेक्षा व्यक्त केली. यावर नूतन पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे म्हणाले की पॉझिटिव्ह कामे पुढे नेण्यासाठी तसेच सोलापूरकरांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक विभागाच्या प्रमुखांकडून माहिती घेऊन आपण काम करू नक्कीच सोलापूरकरांना दर्जेदार मूलभूत सुविधा प्राधान्य देऊ अशी ग्वाही देखील यावेळी त्यांनी दिली. याप्रसंगी इच्छा भगवंताची मित्र परिवाराचे सचिन आंगडीकर,वसंत कांबळे,महादेव राठोड, उमेश राठोड आदींची उपस्थिती होती.

# गावाशेजारील जंगलात आग लागताच वन खात्याच्या १९२६ या क्रमांकावर फोन करावा- प्रा. जयपाल पाटील

**अलिबाग (कटूसत्य वृत्त):-** देवीन इंग्लिश स्कूल वावे यांनी विद्यार्थी व पालक यांनाआयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय वायुसेनेचे निवृत्त माजी अधिकारी मोहन विशाल वत्स यांनी केले. यावेळी ते म्हणाले आपण जिथे राहतो जिथे कुठे फिरतो अशावेळी आपल्या मनाला चुकीचे काही जाणवले तर मुलांनो आणि पालकांनो आपला देश प्रथम ही भावना मनात कायम ठेवून देशाच्या सुरक्षेसाठी कायम आपल्याला सुरक्षित ठेवणारे पोलीस यांना ती घटना गोष्ट तातडीने सांगावी असे वस्त यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे संस्थापक चेअरमन भारतीय वायुसेनेचे निवृत्त माजी अधिकारी एडवोकेट मधुकर वंजारी, ते म्हणाले नैसर्गिक आपत्ती व माणसाकडून होणारी आपत्ती ही कधीही सांगून येत नाही त्यामुळे आपले आर्थिक शारीरिक अतोनात नुकसान होते, यासाठी या विषयाचे तज्ञ प्रा. जयपाल पाटील यांच्याकडून हे महत्त्वाचे प्रशिक्षण पालकांना व त्यांच्या विद्यार्थ्यांना देण्याचे माज्या मनात कायम होते त्याचा लाभ सर्वांनी घेऊन



इतरांनाही सांगावा असे सांगितले. व्यासपीठावर शाळेचे संचालक एडवोकेट राकेश पाटील, डॉ., जानू तुरे, आपत्ती व्यवस्थापन तज्ञ रायगड भूषण, प्राध्या.जयपाल पाटील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्राध्या.जयपाल पाटील यांनी विद्यार्थ्यांनी पालकांकडून संविधान वाचन करून घेतले. त्यानंतर गावाशेजारी असलेल्या जंगलात कधी केव्हाही वणवा पेटला, आग लागली त्यामुळे पर्यावरणाचे, जंगली जनावरांचे होणारे नुकसान महाराष्ट्र शासनाच्या वन खात्याच्या संपर्क केल्यास ती विझविण्यासाठी गावाच्या नजीक असलेल्या वनखात्याचे अधिकारी तातडीने येतात. त्याप्रमाणे परिमंडळ वन अधिकारी दीपक मोकल, सुनिता घुले, व आकांक्षा चव्हाण नियत क्षेत्र अधिकारी त्यांचे कर्मचारी मयूर पाटील, अलंकार पाटील, भालचंद्र काटकर हे तातडीने आग लावण्यात आग विझवण्याची मशीन घेऊन आले. व त्याचे प्रात्यक्षिक दाखवून जंगलामध्ये जेव्हा कधी आग लागली तर आमच्या वनखात्याच्या या क्रमांकावर संपर्क साधावा यावेळी शेतकऱ्यांनी ही आम्हाला मदत करावी. ज्यामुळे आपल्या देशाच्या वनखात्याचे नुकसान होणार नाही, ही लागलेली आग आपली घरे गुरांचे गोठे ही व मनुष्य जीवित हानी ही होऊ शकते यासाठी आम्हाला तातडीने कळवावे असे दीपक मोकल परिमंडळ वन अधिकारी यांनी सांगितले. आपली घरे दाटीवाटीची असतात त्यामुळे आपल्या चुकीमुळे, अथवा कोणीतरी आपल्या शेतातील उडव्यांना, गोठ्याला अथवा गॅस सिलेंडरचा गळतीमुळे आग लागली, तर आपल्या तालुक्याचे आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तहसीलदार यांच्यासोबत संपर्क साधावा असे प्रा. जयपाल पाटील यांनी सांगितले. यावेळी रस्त्यावर कधी केव्हाही वाहनांचे अपघात झाले तर रायगड पोलीस दलाच्या वाहतूक शाखेबरोबर संपर्क साधतात. बरोबर अर्ध्या तासाने अलिबाग वाहतूक शाखेतून पोलीस हवालदार प्रशांत म्हात्रे, सहकारी हवालदार रोहित शिंदे शाळेजवळ पोहोचून हवालदार प्रशांत म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांच्या वाहतूक करणारी वाहने त्यांचे चालक-मालक यांची मुलांची काळजी कशी घ्यावी, महिलांनी कायम हेल्मेटचा वापर करावा, महाराष्ट्र शासनाचे नव्याने आलेले वाहतूक नियमांची त्यांनी माहिती दिली आणि त्यांचे सहकारी रोहित शिंदे यांनी जिल्हा पोलीस वाहतूक शाखेची छापील माहितीपत्रके उपस्थित पालकांना दिली.यावेळी आपल्या गावातील बाळंतपणासाठी माहेरी आलेल्या महिलेला शेवटच्या क्षणी रुग्णालयात पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या १०२ क्रमांकावर आरोग्य खात्यास संपर्क साधता, रायगड जिल्हा परिषदेच्या रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रमुख डॉक्टर विकासिनी चौहान यांनी वाहन चालक नाईक यांना तातडीने रुग्णवाहिका घेऊन पाठविले. उपस्थितताना प्राध्यापक जयपाल पाटील यांनी उंचावरून रस्त्याच्या बाजूला रुग्णवाहिका आली आहेत बाळंतपणासाठी जाणाऱ्या महिलेला, कसे न्यायचे याचे हाताची घडी, आणि घरातील सोलापुरी सादरीत नेण्याचे प्रत्यक्ष दाखविले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षिका मेघा म्हात्रे, श्रीमती पूजा भोईर, वैदेही वेटकोळी नंदिनी भगत, तृप्ती पाटील, प्रणाली राऊत, कर्मचारी सुनिता वालेकर, शिल्पा राऊत, आपत्ती सुरक्षा मित्र विकास रणपिसे, कुमार वाजंत्री, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीना पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन एडवोकेट राकेश पाटील यांनी मानले. यावेळी पालक आणि विद्यार्थी शिक्षक 200 जण उपस्थित होते.

# आकाश ढवळे व प्रियंका पाटील यांचा माऊली शिक्षण संस्थेच्या वतीने सन्मान संपन्न

**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित, लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्यु. कॉलेज टेंभुर्णी येथे 'अधिकारी आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचेही अधिकारी होण्याचे स्वप्न अधिकाधिक सोपस्कर व्हावे या हेतूने संस्थेने हा नवीन कृतीशील उपक्रम आयोजित केला आहे. हा सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रतिमा पूजनाने सदर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून शिक्षण घेत या दोन्ही गुणवंतांनी यश मिळविले. यातूनच अन्नसुरक्षा



अधिकारी वर्ग दोन या पदासाठी प्रियंका प्रताप पाटील यांची नियुक्ती झाली आहे. तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये आकाश मदन ढवळे यांची नियुक झाली. त्याबद्दल हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना आकाश ढवळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपण अभ्यास किती वेळ करतो यापेक्षा कसा करतो याकडे जास्त लक्ष द्यावे. जेवढी जास्त मेहनत घ्याल तेवढे यश तुमच्या जवळ येईल. मोबाईल पासून दूर रहा. वर्तमानपत्र दररोज वाचत चला अशा अनेक लहान मोठ्या सूचना त्यांनी विद्यार्थ्यांना केल्या.

सदर कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे, प्रशालेचे प्राचार्य विकास करळे, आकाश ढवळे, प्रियंका पाटील, अमृत पाटील, संजय काका पाटील, अमित पाटील, बालाजी ढवळे, अरुण ढवळे व इतर अनेक मान्यवर, शिक्षक शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या वतीने विविध ग्रंथालयांना शिव विचारांचे पुस्तक भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून शहर झ्र जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या सूचनानुसार शहरात स्वराज्य सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक काँग्रेस आयोजक प्रदेश सचिव महेश कुलकर्णी विविध ग्रंथालयांना शिव विचार मनामनात शिव विचार घराघरात पोहोचवण्यासाठी शिव विचारांचे



पुस्तक भेट स्वरूपात देण्यात आले. यामध्ये नागरबाई सिद्धगवडा वाचनालय, लक्ष्मी माता सार्वजनिक वाचनालय, हुतात्मा सार्वजनिक वाचनालय, देगाव सार्वजनिक वाचनालय, शेर शिवाजी वाचनालय, सिंगल माता सार्वजनिक वाचनालय, राघवेंद्र सार्वजनिक वाचनालय, बंडगर सर्वजनिक वाचनालय, या वाचनालयांना पुस्तक भेट देण्यात आले.

व्यासपीठावर शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, युवक अध्यक्ष सुहास कदम, संघटक दत्तात्रय बडगंची, प्रदेश उपाध्यक्ष साजिद पटेल सहकार सेल अध्यक्ष भास्कर आडकी युवती विभाग अध्यक्ष किरण माशाळकर, महिला आघाडी सरचिटणीस सुरेखा घाडगे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. आयोजक महेश कुलकर्णी यांच्या या स्तुत्य उपक्रमांचा शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी विशेष कौतुक केल.

यावेळी विविध ग्रंथालयांचे अध्यक्ष कुंडलिक मोरे, जयंत आराध्ये, प्रवीण लबडे, नंदू नवगिरे, वृषाली हजारे, राजश्री माशाळकर, सोनल पिंगळे, मारुती पाथरूट, अंकुश लोहार, धोंडीबा बंडगर, यांच्यासह विविध ग्रंथांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.शिंदेंनी पीर टाकळीत केला विद्युत उपकेंद्राच्या कामाचा शुभारंभ




**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील पीर टाकळी व आसपासच्या गावांमध्ये कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्यामुळे शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या होत्या. या भागातील बहुतांश क्षेत्र ओलिताखाली असल्याने विद्युत उप केंद्र होणे गरजेचे होते. खासदार प्रणिती शिंदे यांच्या गाव भेट दौऱ्यात ग्रामस्थांनी 33/११ ङ श विद्युत केंद्र व्हावे अशी मागणी केली होती. खासदार प्रणिती शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कडे सातत्याने पाठपुरावा करून 33/११ ङ श विद्युत उप केंद्राची मंजुरी मिळविली आणि या २ कोटी ५० लाख रुपयांच्या विद्युत उप केंद्राच्या कामाचा भूमिपूजन समारंभ खासदार शिंदे यांच्या हस्ते मान्यवर नेतेमंडळी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी प्रणिती शिंदे यांनी या विद्युत उपकेंद्रामुळे पीर टाकळी, कामती जिल्हा परिषद गट आणि इतर गावांतील शेतकऱ्यांची विजेची समस्या कमी होऊन शेतीसाठी पाणी, उद्योगासाठी वीज मिळण्यासाठी सोयीचे होणार आहे.

यावेळी मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, ज्येष्ठ नेते सुभाष अण्णा पाटील, पीर टाकळी सरपंच अनिकेत पाटील, महेश धुमाळ, अशोक भोसले, सुनील पवार, महावितरण चे अधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकलूज बस डेपो साठी नवीन एसटी बसची मागणी, शिवसेनेच्या वतीने गोगावले यांना निवेदन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** अकलूज बस डेपोसाठी नवीन २० एसटी बस मिळणेसाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे शिवसेनेचे नेते राजकुमार हिवरकर पाटील यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी पणन व खारभूमी मंत्री भरत गोगावले हे नातेपुते येथील शिवसेना भवन या ठिकाणी सदिच्छा भेट देण्यासाठी आले असता शिवसेनेचे माळशिरस तालुका नेते राजकुमार हिवरकर पाटील यांनी अकलूज बस डेपो साठी एसटी बस मागणीचे निवेदन मंत्री भरत गोगावले यांना दिले. अकलूज बस डेपोच्या जुन्या झालेल्या जवळपास ४० एसटी बसेस आहेत. पूवी त्या १००च्या वर होत्या, बसची संख्या कमी झाल्याने विद्यार्थ्यांना खेड्या गावावरून येण्यास अडचण



निर्माण होत आहे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पर्यटन दर्शन वारी योजना अखंड चालू ठेवण्यासाठी बस उपलब्ध असणे अत्यत

गरजेचे आहे. , रोजगारासाठी, रुग्णांना उपचार घेण्यासाठी तसेच शिक्षणासाठी बारामतीमध्ये जाणारे हजारो विद्यारथी, विद्यार्थिनी महिला पुरुष एसटी बसचा वापर करतात. अपुरे असलेल्या बसच्या संख्येमळे शिक्षण घेणे अवघड झालेले आहे. अकलूजच्या जवळ पंढरपूर तीथक्षेत्र, अकलकोट गोंदावले, शिर्डी, नाशिक त्रिंबकेश्वर आदी धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी नागरिकाना बस उपलब्ध नसल्याने त्याठिकाणी जाणे शक्य होत नाही. तरी आपण निवेदनाचा सकारात्मक विचार करून अकलूज डेपोसाठी नवीन २० एसटी बसेस " उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेनेच्या वतीने करण्यात आली असून सदर निवेदन नातेपुते येथील शिवसेना भवन या ठिकाणी मंत्री भरत गोगावले यांना शिवसेनेचे नेते राजकुमार हिवरकर पाटील तसेच सनी भरडकर विनोद बोराटे भोजराज हिवरकर भाजपाचे मनोज जाधव बबन रुपनवर शंकर शिंगाडे रियाज शेख दत्ता गोरे तसेच शिवसेना भाजप राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य महाआरोग्य शिबिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पद्मशाली युवक संघटना व श्री मार्कंडेय सोलापूर रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने गोदूताई परुळेकर नगर विडी घरकुल ब ग्रुप, एस पॉईट जवळ येथे भव्य महाआरोग्य शिबिर पार पडले. या शिबिरात विविध आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि आवश्यक औषधांचे वितरण यांसह नागरिकांना विविध आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टर व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्ण तपासणी करून आवश्यक उपचार व सल्ला दिला. शिबिरादरम्यान आरोग्य जागरूकता वाढविण्यासाठी विशेष कार्यशाळा आणि संवादी कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रम




राबविण्याची पद्मशाली युवक संघटनेची परंपरा कायम ठेवत यंदाही गरजू व गरीब लोकांसाठी मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी ॲड. अनिल वासम, गिरीश कोटा यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, सचिव विजय निली, उपाध्यक्ष ॲड.शाम आडम, अंबादास कुडक्याल,महेश येमुल, प्रवीण जिल्ला,श्रीनिवास गुंडेटी ॲड श्रीप्रसाद अंकलगी, ॲड.चैतन्य केंगार, हिरालाल कामूर्ती, अक्षय यन्नम, व्यंकटेश यनगंदूल, इरेश चिलवेरी, महेश मार्चला,नवीन फुलपाटी, नागेश मंथेन,आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यापुढेही समाजहितासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे. या महाआरोग्य शिबिराचा स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.